# जिल्हा निवड समिती रायगड

# रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पदभरती १/२०१४

जाहिरात क्रमांक - राजिप/साप्रवि/आस्था-५/ प्र.क्र.७ /२५३३ /२०१४, दिनांक २२/८/२०१४

**************************************************************************************************

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.एपिटी२०१४/प्र.क्र.४८/आस्था-८, दिनांक १२ ऑगस्ट २०१४ चे अनुषंगाने रायगड जिल्हा परिषद अंतर्गत खालील परिच्छेद २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सरळसेवेने भरावयाच्या गट-क व गट-ड च्या पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज स्विकारणेचा कालावधी दिनांक १ सप्टेंबर २०१४ ते दिनांक २५ सप्टेंबर २०१४ राहील. परिच्छेद २ मधील पद क्रमांक १ ते १३ कडील पदे गट क मधील आहेत तर पद क्रमांक १४ गट ड मधील आहे. **ज्या उमेदवारांनी सहाय्यक संचालक जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, अलिबाग व पनवेल, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, अलिबाग तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी रायगड अलिबाग इत्यादी कार्यालयात रोजगारासाठी नांव नोंदणी केली असेल त्यांनी देखील इच्छुक व पात्र असल्यास विहीत शुल्क भरुन उक्त पदांकरीता ऑन लाईन अर्ज करणे आवश्यक राहील.** पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणाचे तपशील परिच्छेद २ मधील विवरणपत्रात नमुद केल्याप्रमाणे आहेत. गट क मधील पदांसाठी उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीमार्फत केली जाईल व गट ड मधील पदांसाठी उमेदवारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा परिषद गट ड निवड समितीमार्फत केली जाईल.

**२) सरळसेवा पदभरतीने भरणेसाठी घोषित पदे.**

| पद क्र. | पदाचे नांव | वेतन संरचना<br>वेतन बँड | <br>ग्रेड वेतन | पदसंख्या व त्यांचे सामाजिक / समांतर आरक्षण | पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (ग्रापापू)** | ९३००-३४८०० | ४३०० | **एकुण पदे : १**<br>**भ.ज.क**<br>(सर्वसाधारण-०१) | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करणें आवश्यक आहे. |
| २ | कृषी अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | **एकुण पदे : १**<br>**खुला-०१**<br>(सर्वसाधारण-०१) | मान्यताप्राप्त कृषी विषयातील स्नातकोत्तर पदवी किमान दुस-या श्रेणीत उत्तीर्ण केली असेल किंवा सांविधिक विद्यापीठातून कृषीविषयक पदवी पहिल्या वर्गात प्राप्त केली असेल किंवा कोणतीही इतर समतूल्य अर्हता धारण केली असेल असे उमेदवार. |
| ३ | **पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना)** | ९३००-३४८०० | ४१०० | **एकुण पदे : ०३**<br>**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०१**<br>(सर्वसाधारण-०१)<br>**खुला-०२**<br>(अंशकालीन-०१)<br>(सर्वसाधारण-०१) | उमेदवार मान्यताप्राप्त संविधिक विद्यापीठाची खासकरुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण (न्यूट्रीशन) या विषयातील पदवीधर असावी **किंवा** मान्यता प्राप्त संविधिक विद्यापीठाची पदवीधर असुन ज्या मध्यमस्तर समन्वित बालविकास सेवा अधिकाऱ्यांच्या व अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षण केंद्राच्या अध्यापिका व मुख्याध्यापिका म्हणून काम करीत आहेत किंवा मान्यताप्राप्त संविधिक विद्यापीठाची पदवीधर आणि बालसेविका किंवा अंगणवाडीसेविका म्हणून खालीलपैकी अनुदानस्त्रोत असणाऱ्या केंद्रामध्ये कार्यरत असावी. १)केंद्र किंवा राज्य शासन २)केंद्रीय समाज कल्याण मंडळ किंवा राज्य समाज कल्याण मंडळ ३)रेडक्रॉस ४)मानव संसाधन विभाग मंत्रालयाकडून बालवाडी पोषण कार्यक्रमांतर्गत अनुदान मिळणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरच्या पुढील कंसातील पाच स्वेच्छा संघटनांपैकी कोणतीही एक (केंद्रीय समाज कल्याण मंडळ, भारतीय बालकल्याण परिषद, हरिजन सेवक संघ, भारतीय आदिमजाती सेवक संघ, कस्तूरबा गांधी नॅशनल मेमोरिअल ट्रस्ट) |
| ४ | **औषध निर्माण अधिकारी** | ५२००-२०२०० | २८०० | **एकुण पदे : ०४**<br>**अनु.जमाती-०२**<br>(महिला-०१, सर्वसाधारण-०१,)<br>**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०१**<br>(सर्वसाधारण-०१)<br>**खुला-०१**<br>(सर्वसाधारण-०१) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासन मान्य फार्मसी पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असावेत. |
| ५ | **वरिष्ठ सहाय्यक (लेखा )** | ५२००-२०२०० | २४०० | **एकुण पदे : ०२**<br>**अनु.जाती-०१**<br>(सर्वसाधारण-०१)<br>**खुला -०१**<br>(महिला- ०१) | अर्जदार लेखाशास्त्र व लेखापरीक्षा हे विशेष विषय घेवून वाणीज्य शाखेतील पदवी धारण करणारे असावेत अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणारा असावा अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारीसंस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात ३ वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यंत लेखाविषयक कामाचा पदवीनंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेले असावेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | ५२००-२०२०० | २४०० | एकुण पदे :४५<br>अनु.जाती-०४<br>(माजीसैनिक-१,खेळाडू-१, प्रकल्पग्रस्त-१, सर्वसाधारण-१)<br>अनु.जमाती-०५<br>(माजीसैनिक-१,खेळाडू-१, प्रकल्पग्रस्त-१, सर्वसाधारण-२)<br>वि.जा.अ-०१<br>( सर्वसाधारण-१)<br>इ.मा.व.-१०<br>(माजीसैनिक-०२,प्रकल्पग्रस्त-१ भुकंपग्रस्त-१, पदविधर अंशकालीन-२ खेळाडू-१, सर्वसाधारण-०३)<br>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०४<br>(माजीसैनिक-०१, खेळाडू-१, सर्वसाधारण-०२)<br>विशेष मागास प्रवर्ग-अ- १<br>(सर्वसाधारण-०१)<br>खुला-१३<br>(माजी सैनिक-२ प्रकल्पग्रस्त-१, भुकंपग्रस्त-१, खेळाडू-१, पदविधर अंशकालीन-२ सर्वसाधारण-६)<br>अपंग-०७<br>(श्रवणदोष-२,दृष्टीदोष-२, चलनवलन विकलांगता-३) | माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेचे अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसविका पदविका उत्तीर्ण केलेली असावी आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असावी किंवा अशा नोंदणीसाठी उमेदवार पात्र असावी. |
| ७ | विस्तार अधिकारी पंचायत | ९३००-३४८०० | ४२०० | एकुण पदे : ०२<br>अनु.जाती-०१<br>(महिला-०१)<br>अनु.जमाती-०१<br>(सर्वसाधारण-०१) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. परंतु ग्रामीण, समाज कल्याण व स्थानिक विकास कार्यक्रमाचा ३ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ५२००-२०२०० | २४०० | एकुण पदे : २६<br>अनु.जाती-०४<br>(महिला-०१ माजी सैनिक-०१ , अंशकालीन-०१, सर्वसाधारण-०१)<br>अनु.जमाती-०४<br>(महिला-०१ माजीसैनिक-०१ , अंशकालीन-०१,सर्वसाधारण-०१)<br>वि.जा.अ-०१<br>(सर्वसाधारण-०१)<br>भ.ज.क-०२<br>(महिला-०१,सर्वसाधारण-०१)<br>भ.ज.ड-०१<br>(सर्वसाधारण-०१)<br>वि.मा.प्र-.०१<br>(सर्वसाधारण-०१)<br>इ.मा.व.-१०<br>(महिला-०२ माजीसैनिक-०१ , अंशकालीन-०१,खेळाडू-०१ सर्वसाधारण-०५)<br>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०१<br>(सर्वसाधारण-०१)<br>खुला-०२<br>(महिला-०१, सर्वसाधारण-०१) | शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणाऱ्या किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण असावी किंवा पुढील पैकी समकक्ष पाठ्यक्रम (१) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन (वास्तुशास्त्रीय आरेखक), (२)कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक), (३) आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठ्यक्रम, (४) National Council of Training for Vocational Trades (NCTVT)/National Apprentice certificate (NAC) द्वारा सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर पदांवरील या शाखेतील अनुभवाच्या आधारे देण्यात येणारे प्रमाणपत्र (शासनाकडून प्राप्त स्पष्टिकरणानुसार स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/ पदवीधारक देखील सदर पदांसाठी अर्ज करु शकतील) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | ५२००-२०२०० | २४०० | एकुण पदे : ०६<br>अनु.जाती-०२<br>(महिला-०१)<br>(अंशकालीन-०१)<br>अनु.जमाती-०१<br>(महिला-०१)<br>भ.ज.ब-०१<br>(महिला-०१)<br>इ.मा.व.-०१<br>(महिला-०१)<br>खुला -०१<br>(महिला-०१) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापिठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्र शिक्षण परीक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठामार्फत चालविलेला **किंवा** महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापिठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील **किंवा** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपुर यांच्या मार्फत चालविण्यांत येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवी धारण करत असतील **किंवा** असे उमेदवार. |
| १० | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२००-२०२०० | २४०० | एकुण पदे : ०८<br>भ.ज.ब-०१<br>(सर्वसाधारण)<br>भ.ज.ड-०१<br>(सर्वसाधारण)<br>इ.मा.व -०३<br>(महिला-०१)<br>(माजी सैनिक-०१)<br>(सर्वसाधारण-०१)<br>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०१<br>(सर्वसाधारण-०१)<br>खुला-०२<br>(महिला-०१)<br>( सर्वसाधारण-०१) | संविधीमान्य विद्यापिठाची पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. |
| ११ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२००-२०२०० | १९०० | एकुण पदे : १६<br>अनु.जाती-०३<br>(माजी सैनिक-१, महिला-०१ सर्वसाधारण-१)<br>अनु.जमाती-०२<br>(महिला-१,सर्वसाधारण-१)<br>वि.जा.अ-०२<br>(महिला-१,सर्वसाधारण-१)<br>भ.ज.ब-०२<br>(महिला-१,सर्वसाधारण-१)<br>इ.मा.व.-०७<br>(माजी सैनिक-०१,<br>प्रकल्पग्रस्त- ०१<br>पदविधर अंशकालीन -०१<br>महिला-०२,<br>खेळाडू-०१<br>सर्वसाधारण-०१,) | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.तसेच टंकलेखन परीक्षा घेण्यासाठी असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी घेतलेल्या मराठी व इंग्रजी टंकलेखन किमान ३० शब्द प्रति मिनिट प्रमाणपत्र धारण करीत असावेत किंवा मराठी व इंग्रजी टंकलेखनात किमान ५० टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. **उमेदवाराकडे वर विहीत केल्याप्रमाणे मराठी टंकलेखन अर्हता असणे अनिवार्य राहील.** जर त्यांचेकडे वर विहीत केलेली इंग्रजी टंकलेखन अर्हता नसेल तर नियुक्तीच्या तारखेपासुन दोन वर्षांच्या कालावधीत ती प्राप्त करणे अनिवार्य राहील<br>तथापि महाराष्ट्र शासन साप्रवि, शा.नि.क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६अ, दिनांक ६ ऑक्टोबर २०१० नुसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकांतील उमेदवार टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण नसले तरी त्यांची नियुक्तीसाठी निवड झाल्यास नियुक्तीच्या दिनांका पासून सहा महिन्यांच्या कालावधीत टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण करण्याच्या अटीवर त्यांना निवड प्रक्रीयेत सशर्त प्रवेश दिला जाईल. माजी सैनिक उमेदवारांमधील सैन्य सेवेतील trade हा operator communication centre असा असल्याने प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी Trade Proficiency Certificate ची प्रमाणीत सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना मराठी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनिट व इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनिट परीक्षा नियुक्ती झालेपासुन ११ महिन्यांच्या आत पास झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा )** | **५२००-२०२००** | **१९००** | **एकुण पदे : ०२**<br>**अनु.जाती-०१**<br>(सर्वसाधारण)<br>**इ.मा.व.-०१**<br>(सर्वसाधारण) | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.तसेच टंकलेखन परीक्षा घेण्यासाठी असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी घेतलेल्या मराठी टंकलेखन किमान ३० शब्द प्रति मिनिट प्रमाणपत्र धारण करीत असावेत किंवा मराठी टंकलेखनात किमान ५० टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>परंतु असे की, इंग्रजी विषय घेवून माध्यमीक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतूल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.<br>कनिष्ठ सहाय्यक(लेखा) या पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यासाठी लेखा विषयक कामकाजाचा पूर्वानुभव असलेल्या उमेदवारास अधिक पसंती राहिल.<br>तथापि महाराष्ट्र शासन साप्रवि, शा.नि.क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६अ, दिनांक ६ ऑक्टोबर २०१० नुसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकांतील उमेदवार टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण नसले तरी त्यांची नियुक्तीसाठी निवड झाल्यास नियुक्तीच्या दिनांका पासून सहा महिन्यांच्या कालावधीत टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण करण्याच्या अटीवर त्यांना निवड प्रक्रीयेत सशर्त प्रवेश दिला जाईल. माजी सैनिक उमेदवारांमधील सैन्य सेवेतील trade हा operator communication centre असा असल्याने प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी Trade Proficiency Certificate ची प्रमाणीत सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना मराठी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनिट परीक्षा नियुक्ती झालेपासुन ११ महिन्यांच्या आत पास झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. |
| १३ | **विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** | **९३००-३४८००** | **४२००** | **एकुण पदे : ०३**<br>**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०१**<br>**(सर्वसाधारण-०१)**<br>**खुला-०२**<br>**(माजीसैनिक-०१, सर्वसाधारण-०१)** | संविधीमान्य विदयापिठाची विज्ञान, कृषि, वाणिज्य किंवा वाङमय शाखेची **अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर व्दितीय वर्गातील पदवी** धारण करीत असावेत **किंवा पदवी व** नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असावा.<br>(परंतु उक्त विषयापैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यांत येईल.) |
| १४ | **परिचर** | **४४४०-७४४०** | **१३००** | एकुण पदे : ३८<br>अनु.जमाती ०१<br>**( महिला-०१)**<br>भ.ज.क-०२<br>**(महिला-१ , सर्वसाधारण १)**<br>भ.ज.ड-०१<br>**(महिला-१ )**<br>इ.मा.व -०६<br>**( माजी सैनीक-१, प्रकल्पग्रस्त-१, महिला-१,अंशकालीन-१ खेळाडू-१, सर्वसाधारण-१)**<br>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)-०६<br>**(महिला-०२, माजी सैनिक-०१, अंशकालीन-१, सर्वसाधारण-०२)**<br>विशेष मागास प्रवर्ग-अ- २<br>**(महिला-१, सर्वसाधारण-०१)**<br>खुला-१७<br>(भुकंपग्रस्त-१, महिला-५, खेळाडू-२, अंशकालीन-२, माजी सैनिक -४, सर्वसाधारण-३)<br>अपंग -०३<br>(मुक/कर्णदोष-०२,दृष्टीदोष-१) | **मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेची कमीत-कमी इयत्ता चौथी उत्तीर्ण** असणे आवश्यक आहे. |

**टिप :** २.१) गरज भासल्यास पद भरतीचा कार्यक्रम रद्द करण्याचे / कोणत्याही टप्प्यावर स्थगीत करण्याचे तसेच त्यात बदल करण्याचे अधिकार निवड समितीच्या अध्यक्षांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

२.२) भरतीसाठी घोषित केलेल्या वरिल पदांमध्ये दिनांक ९ जुलै २०१४ रोजीची रिक्त पदे आणि ३० एप्रिल २०१५ अखेर पर्यंत नियतवयोमान सेवानिवृत्तीने रिक्त होणारी पदे यांचा समावेश आहे. त्यामुळे निवड यादीतील ज्या उमेदवारांची संभाव्य रिक्त पदांसाठी निवड होईल त्या उमेदवारांना सदर पदे जसजशी रिक्त होतील तसतसे नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२.३) खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधुन गुणवत्तेनुसार निवड करण्याचा विचार होऊ शकेल.

२.४) वरिल घोषित पदांसाठी मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे अतिरीक्त संवर्ग कक्षाकडून पात्र उमेदवार प्राप्त झाल्यास तेवढ्या प्रमाणात पदे कमी होऊ शकतील.

२.५) सदर पदभरतीच्या नियम/निकषामध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय/परिपत्रक/अधिसूचना/पत्रानुसार बदल होऊ शकतो.

२.६) परिच्छेद २ मधील अनुक्रमांक ३ पर्यवेक्षिका(एकात्मिक बालविकास सेवा योजना) व अनुक्रमांक ६ आरोग्य सेवक (महिला) या पदांसाठी फक्त महिला उमेदवारच अर्ज करु शकतील.

२.७) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. अपंग १००९/प्र.क्र. २७६/०९/१६अ, दिनांक १९/०३/२०१० मधील सूचनांनुसार अपंगांसाठी आरक्षीत असलेली पदे खुली म्हणून घोषित केली आहेत. या पदांसाठी कोणत्याही सामाजिक प्रवर्गातील पात्र अपंग उमेदवार अर्ज करु शकतील. (तथापि प्रत्यक्ष निवडीत या पदावर निवड झालेले उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गाचे असल्यास त्यांना निवडी नंतर मागासवर्गीय बिंदूवर समायोजीत करण्याची मुभा नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहील.)

२.८) या जाहिरातीत नमुद शैक्षणिक अर्हता/इतर अर्हता/वयोमर्यादा अर्ज करतेवेळी उमेदवाराने धारण केलेली असणे आवश्यक आहे. वयोमर्यादेसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिवस हा संदर्भ दिनांक राहील.

३) **वयोमर्यादा :- ( ऑनलाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिवशी )**

उमेदवाराचे वय ऑनलाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे आणि खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्षापेक्षा व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

कमाल वयोमर्यादा पुढील प्रकरणी शिथीलक्षम असेल.

अ) जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-याचे बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत. (नियुक्ती प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.)

ब) शारीरिक दृष्टया अपंग उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

क)संरक्षण दलात ६महिन्यांपेक्षा जास्त सलगसेवा केलेल्या माजी सैनिकांकरीता सरंक्षण दलातील सेवा अधिक ३ वर्ष तथापि अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

ड) स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

इ) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त यांच्या नामनिर्देशित उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

फ) सुशिक्षित बेरोजगांराना अर्थ सहाय्य या योजनेअंतर्गत तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांबाबत कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत.

ग) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

च) खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम.

छ) आरोग्य सेवक (महिला) पदासाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत शिथीलक्षम.

ज) पर्यवेक्षिका ए.बा.वि.से.यो या पदासाठी केंद्र किवा राज्य शासन , केंद्रीय समाजकल्याण मंडळ किंवा राज्य समाजकल्याण मंडळ, रेडक्रॉस, भारतीय बालकल्याण परिषद, हरीजन सेवक संघ, भारतीय आदिम जाती सेवक संघ, कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरीयल ट्रस्ट यापैकी कोणत्याही स्त्रोतातून अनुदान मिळणा-या बालवाडी किंवा शिशु शिक्षण किंवा शालेय पूर्व शिक्षण केंद्र किंवा पूरक पोषण केंद्रात काम करणा-या बालसेविका किंवा अंगणवाडी सेविका यांच्याकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता असल्यास त्यांचेबाबत वयाची कमाल वयोमर्यादा १५ वर्षापर्यंत किंवा अशा संस्थात काम केलेल्या कालावधीपैकी कमी असलेल्या कालावधीसाठी मात्र अशा कोणत्याही प्रकरणी वयाच्या ४५ वर्षे कमाल मर्यादेस अधिन राहून शिथिलक्षम राहिल. अशाच प्रकारे मध्यमस्तर समन्वीत बालविकास सेवा अधिकाऱ्यांच्या व अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षण केंद्रात अध्यापिका आणि/किंवा मुख्याध्यापिका म्हणून काम केलेल्या अर्जदाराबाबत कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४) **संगणक अर्हता -**

परिच्छेद २ मधील दर्शविलेल्या अ.क्र.१ ते १३ कडील पदांकरीता महाराष्ट्र नागरी सेवा ( संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविणेबाबत ) नियम १९९९ च्या ३ अन्वये अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असावे.

तसेच खाली नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्त्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१) D.O.E.A.C.C./N.E.I.L.I.T. नवी दिल्ली चे प्रमाणपत्रधारक.

२) राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी माहिती तंत्रज्ञान विषय अभ्यासणा-या विद्यार्थ्यांना व इयत्ता ११ व इयत्ता १२ वी साठी माहिती तंत्रज्ञान ,संगणक शास्त्र, कॉम्प्युटर टेक्निक व मल्टीमिडिया ॲड इंटरनेट टेक्नॉलॉजी हे विषय अभ्यासून उत्तीर्ण.

३) केंद्रीय माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षा संगणक /माहिती तंत्रज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण.

४) महाराष्ट्र राज्य तंत्रज्ञान मंडळाच्या संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology)/संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering)/माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी/पदवीका व संगणक उपाययोजन (Computer Application), संगणक उपाययोजन पद्धती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma), सर्व शासन मान्य विद्यापिठातील संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology) /संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering) /माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी/पदवीका व संगणक उपाययोजन (Computer Application),संगणक उपाययोजन पद्धती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma) उत्तीर्ण केलेले उमेदवार.

५) व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणारे,परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेले संगणक विषयी ८६ अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्रधारक.

सदरचे प्रमाणपत्र नसल्यास परिच्छेद २ मधील अ.क्र.१ ते १३ कडील पदांसाठी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत विहित संगणक अर्हता प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य राहील अन्यथा उमेदवारांस नेमणूक मिळाली तरी ती संपुष्टात आणली जाईल.

**५) परिक्षा शुल्क**

खाली नमुद केल्यानुसार मागासवर्गीय उमेदवारांकरीता व इतर उमेदवारांकरीता परीक्षा शुल्क आकारण्यात येईल **माजी सैनिक यांनी अर्जासोबत परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

| पदाचे नाव | मागासवर्गीय उमेदवारांसाठी परिक्षा शुल्क | इतर उमेदवारांसाठी परिक्षा शुल्क |
|---|---|---|
| **सर्व पदांसाठी** | **रुपये ७५/- (रु.पंच्याहत्तर मात्र)** | **रु. १५०/ ( रु. एकशे पन्नास मात्र)** |

**६) अर्ज करण्याची पध्दत**

६.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचे आहेत. इतर कोणत्याही पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

६.२ उमेदवारांनी online अर्ज भरण्यापूर्वी www.raigad.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर वाचून नंतरच उमेदवारांनी आपला अर्ज भरावा.

६.३ online अर्ज भरण्यापूर्वी www.raigad.gov.in या संकेतस्थळावर जाऊन परीक्षा शुल्क बँक चलनाव्दारे खाते क्रमांक ३३८७६८७२१७५ मध्ये भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उमेदवार वरील संकेतस्थळावरुन बँक चलनाचा नमुना दोन प्रतीमध्ये डाऊनलोड करुन घेवून प्रिंट काढून घेईल व त्यातील आवश्यक माहिती भरुन चलनात नमुद असलेले परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणा करेल व सदर शाखेकडून चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID/Journal Number नमुद केला जाईल तसेच चलनाच्या दोन प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत शाखेकडून परत देण्यात येईल सदर प्राप्त झालेला Transaction ID/Journal Number ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केल्यानंतर ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता उपलब्ध होईल. Transaction ID/Journal Number नमुद न करता अर्ज भरल्यास अर्ज स्विकृत होणार नाही याची नोंद घ्यावी. त्यानंतर उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची प्रिंट काढून ठेवावी व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क जमा केले म्हणजे लेखी परीक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येवू नये. उमेदवारांनी सदर अर्जाची प्रिंट व चलन भरल्याची मुळ प्रत कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

६.४ इंटरनेटवर उपलब्ध होणारा अर्ज क्रमांक जपून ठेवावा कारण परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करतांना आपणास प्राप्त होणारा अर्ज क्रमांक व उमेदवाराची जन्मतारखेवरुन प्रवेशपत्र काढता येईल.

६.५ उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेत **(खाते क्रमांक ३३८७६८७२१७५ मध्ये)** पैसे भरल्यानंतर त्याची स्थिती www.raigad.gov.in या संकेतस्थळावर पाहता येवू शकेल.

६.६ परिचर पदासाठी अर्ज भरताना ४ थी उत्तीर्ण व त्यापुढील शैक्षणिक अर्हता नमुद कराव्यात. तसेच इतर पदांकरीता शालांत परिक्षा व त्यापुढील शैक्षणिक अर्हता नमुद कराव्यात.

६.७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीव्दारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वत:चा अद्यावत विहित पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन www.raigad.gov.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार अपलोड करणे आवश्यक आहे तसेच बँक चलनाची प्रत स्कॅन करुन www.raigad.gov.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड करताना फोटोची, सहीची साईज २०० केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. **तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.**

६.८ पात्र उमेदवाराला वेबबेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.raigad.gov.in या वेबसाईटव्दारे सादर करणे आवश्यक राहील ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

६.९ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR(National Customer Preference Register) किंवा DND (Do Not Disturb) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहिल. तसेच ई-मेल आयडी, व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रीक अडचणींना अध्यक्ष , जिल्हा निवड समिती तसेच सदस्य सचिव जिल्हा निवड समिती हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती घेण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

६.१० उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणीक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे

आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्पावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

६.११ उमेदवारांची लेखी परीक्षा हि त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत.उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रता वस्तुस्थितीदर्शक असल्याचे गृहीत धरुन निवड यादी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून सशर्त प्रसिध्द केली जाईल आणि मुळ कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र असल्याचे आढळून आल्यास त्यांची निवड कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल तसेच पात्रता धारण न करणा-या उमेदवाराची निवड कोणत्याही टप्पावर रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती यांनी राखून ठेवलेले आहेत व याबाबत कोणत्याही उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

६.१२ ऑन लाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परीपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती/अर्जाची पात्रता/अपात्रता/ परीक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/ परीक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल याकरीता स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

६.१३ अपंग उमेदवारास लेखी परीक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑन लाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा ज्या उमेदवारांनी अर्जात लेखनिकाची मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**७) निवड यादीमध्ये समाविष्ट उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करावयाची कागदपत्रे**

उमेदवाराने कागदपत्र पडताळणीच्या वेळेस मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रके तसेच खालील प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रतीचा संच घेवून उपस्थित रहाणे आवश्यक आहे. केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्यप्रतीच स्विकारल्या जातील.मुळ प्रमाणपत्रके अवलोकन करुन पडताळणीचे वेळीच उमेदवारास परत करण्यात येतील.

**७.१ Online अर्जाची प्रत(print) व चलनाची मूळ प्रत**

७.२ शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे व गुणपत्रके.

७.३ जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्मदाखला/शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परिक्षा प्रमाणपत्र.

७.४ आरक्षित पदांसाठी अर्ज केला असल्यास सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (मात्र आरक्षित पदासाठी निवड झाल्यास जातवैधता प्रमाणपत्र विहीत कालावधीत सादर केले नाही तर आरक्षित पदावर दिलेली नेमणूक रद्द केली जाईल.)

७.५ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इमाव,शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग-अ या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या उमेदवारांनी तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिलां उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले सन २०१४-१५ साठी वैध असलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहिल. **अर्जदार सन २०१४-२०१५ साठी वैध असलेले नॅान-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत तर त्यांना संबधित आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही.**

७.६ अपंग/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पदवीधर-पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांबाबत समांतर आरक्षणाच्या पुष्टयर्थ सक्षम प्राधिका-याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा समांतर आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. माजीसैनिकांनी डीस्चार्जकार्डच्या प्रमाणीत सत्यप्रती सादर करणे आवश्यक राहील. युद्ध काळात किंवा यूद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन नोकरी साठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला माजीसैनिक आरक्षणात नियुक्ती देण्याची तरतुद महाराष्ट्र शासन सा.प्र.वि. शा.नि.क्र.आरटीए/१०८२/३५०२/सी आर १००/१६ अ, दिनांक २ सप्टेंबर १९८३मध्ये आहे. सदर तरतुदीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र अर्जदारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा तसा दाखला, संबंधीत सैनिकाचा मृत्यू दाखला अथवा अपंगत्वाच्या कारणास्तव सेवेस अपात्र प्रमाणपत्र तसेच सदर सैनिकाच्या कुटुंबातील आपण सदस्य असलेबद्दल तसेच यापूर्वी कुटुंबातील अन्य कोणीही माजी सैनिक आरक्षणाखाली लाभ घेतला नसलेबद्दल कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत जोडावी. (तथापि अशा नेमणुकीचा प्राधान्य क्रम युद्धकाळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजीसैनिकांच्या नंतर राहील.)

७.७ खेळाडू म्हणून लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय दिनांक ३०/०४/२००५ च्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता प्राप्त क्रिडा स्पर्धात वैयक्तिक/सांघिक स्पर्धेत प्रथम/द्वितीय/तृतीय क्रमांकाचे किंवा सुवर्ण पदक / रौप्य पदक / कांस्य पदक यापैकी पदक/पारितोषिक मिळालेबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही.

७.८ चलनवलन विषयक विकलांगता, दृष्टीदोष,कर्णदोष या स्वरुपाच्या अंपगत्वाबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय मंडळाकडील अथवा विहित केलेनुसार त्रिसदस्यीय वैद्यकिय मंडळाकडील अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. किमान ४० % कायमस्वरुपी अपंगत्व असणे आवश्यक आहे. क्षीणदृष्टीचे बाबतीत ४० % ते ६० % अपंगत्व असणारे उमेदवारच पात्र राहतील. उमेदवारांची अपंग राखीव पदासाठी निवड झाल्यास स्थायी वैद्यकिय मंडळाकडून तपासणी होऊन निवड झालेल्या पदाकरीता वैद्यकिय दृष्टया पात्र ठरल्यासच नेमणूक आदेश देण्यात येतील.

७.९ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षित पदांचा लाभ घेऊ इच्छिणा-या अर्जदारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात किमान तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेबद्दल सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सोबत जोडावा व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचा पुरावाही सोबत जोडावा.

७.१० महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ अन्वये उमेदवाराने त्यांच्या अर्जाच्या दिनांकास

हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदाराच्या हयात मुलांपैकी दिनांक २८ मार्च २००६ नंतर तिस-या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा. (अविवाहीत अर्जदाराने सुद्धा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

७.११ सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

७.१२ सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांचेबाबत कामकाजापृष्ठयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

७.१३ महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेबाबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/प्र.क्र.३६/का ३६, दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा विभागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. तथापि त्यांनी सदर ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य असलेबद्दल रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिका-यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. अनुसूचित जातीसाठी दिनांक १० ऑगस्ट १९५०, विमुक्त जाती / भटक्या जमाती साठी दिनांक २१ नोव्हेंबर १९६१, इतर मागासवर्गासाठी दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ व विशेष मागास प्रवर्गासाठी दिनांक १३ जून १९९५ या तारखेस किंवा त्यापुर्वीपासून उमेदवाराचे वा त्याच्या वडिलांचे महाराष्ट्रामध्ये अधिवास असणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे अधिवासाचे पुरावे सादर करणे बंधनकारक राहिल.

७.१४ नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

७.१५ जिल्हा परिषद कर्मचारी म्हणून कमाल वयोमर्यादेत शिथीलतेचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी नियुक्ती प्राधीका-याचे पूर्वपरवानगीची मुळ प्रत व प्रमाणीत सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील.

**८) इतर महत्वाच्या सुचना**

८.१ अर्जदार भारताचा नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असलेबद्दल अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

८.२ शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची मुळ प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

८.३ मागासवर्गीय आरक्षीत पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी२०११/प्र.क्र.१६४/२०११/१६ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे. असे जात वैधता प्रमाणपत्र संबंधीत उमेदवार विहित मुदतीत सादर करु शकले नाहीत तर त्यांची झालेली निवड व नेमणूक रद्द होणेस पात्र राहील.

८.४ जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात अथवा अन्य तत्सम शासकीय/निमशासकीय प्राधिका-यांकडे रोजगारासाठी नाव नोंदणी केली असल्यास नाव नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

८.५ क्रिडा विषयक प्रमाणपत्राच्या आधारे खेळाडू आरक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांबाबत मा.संचालक, क्रिडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी क्रिडा विषयक प्रमाणपत्र वैध ठरविल्यानंतरच उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल. क्रिडाविषयक प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास झालेली निवड आपोआप संपुष्टात (रद्द ) येईल.

८.६निवड झालेल्या उमेदवारांची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी करण्यात येईल. पडताळणी अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द होऊ शकेल.

८.७निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. तपासणी अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द होऊ शकेल.

८.८ उमेदवारांना लेखी परीक्षेस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

८.९ निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८.१० शासन निर्णय वित्त विभाग अनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये दिनांक १.११.२००५ रोजी किवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन परीभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

८.११ भरती प्रक्रियेच्या संदर्भात काही तक्रारी मतभेद निर्माण झाल्यास न्यायालयीन अधिकार क्षेत्र अलिबाग शहर न्यायालयाच्या कक्षेतच राहिल.

८.१२ ज्या पदांच्या लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहेत अशा पदांबाबत उमेदवार कोणत्याही एकाच पदाच्या लेखी परीक्षेस बसू शकतो . दोन्ही पदासाठी अर्ज केल्यास संबधित उमेदवार एका पदाच्या लेखी परीक्षेस न बसणेबाबत वैयक्तिकरित्या जबाबदार राहिल.

८.१३ उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होऊन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परिक्षा व प्रशिक्षण विहीत संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहीत केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल.

८.१४ उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे अथवा प्रमाणपत्रे बनावट असल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल.

८.१५ उमेदवारांनी यापूर्वी जिल्हा परिषदेकडे नेमणूकीसाठी थेट अर्ज केले असतील तर ते ग्राहय धरले जाणार नाहीत. या जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील.

८.१६ निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा इतर अपरीहार्य कारणामुळे विहित दिवशी लेखी परिक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी लेखी परिक्षा घेतली जाईल.

९) लेखी परीक्षेचे वेळापत्रक

| अ. क्र. | पदाचे नांव | लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | रविवार दिनांक ०२/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| २ | **कृषी अधिकारी** | रविवार दिनांक .०२/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| ३ | **पर्यवेक्षिका** (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) | रविवार दिनांक .०२/११/२०१४ दुपारी ०२.०० ते ०३.३० |
| ४ | **औषध निर्माण अधिकारी** | **शनिवार दिनांक ०८/११/२०१४,सकाळी १०.०० ते ११.३०** |
| ५ | **वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** | शनिवार दिनांक ०८/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | शनिवार दिनांक .०८/११/२०१४दुपारी ०२.०० ते ०३.३० |
| ७ | विस्तार अधिकारी (पंचायत) | रविवार दिनांक ०९/११/२०१४ दुपारी २.०० ते ३.३० |
| ८ | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | रविार दिनांक ०९/११/२०१४ दुपारी २.०० ते ३.३० |
| ९ | **पशुधन पर्यवेक्षक** | रविवार दिनांक १६/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| १० | **वरीष्ठ सहाय्यक (लिपीक)** | रविवार दिनांक .१६/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| ११ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)** | रविवार दिनांक १६/११/२०१४ दुपारी ०२.०० ते ०३.३० |
| १२ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा )** | रविवार दिनांक १६/११/२०१४ दुपारी ०२.०० ते ०३.३० |
| १३ | **विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** | शनिवार दिनांक.२२/११/२०१४ सकाळी १०.०० ते ११.३० |
| १४ | **परिचर** | शनिवार दिनांक २२/११/२०१४ दुपारी ०२.०० ते ०३.३० |

**१०) प्रश्न पत्रीकेचे स्वरुप**

परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रत्येक प्रश्न दोन गुणांचा असेल ज्या पदासाठी व्यावसायिक ज्ञान आवश्यक असेल अशा पदांसाठी लेखी परिक्षा २०० गुणांची राहील. आाणि त्यापैकी ८० गुणांचे प्रश्न त्या पदाशी संबधीत तांत्रिक ज्ञानावर आधारीत राहतील. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना संबधित जिल्हयाचा भूगोल, सामाजिक इतिहास, हवामान इत्यादी स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

| अ क्र | पदाचे नाव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बुध्दिमापन व गणित | | तांत्रिक प्रश्न | | एकूण | | प्रश्नपत्रीकचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, ग्रा.पा.पू)** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **सर्व विषय एस एस सी दर्जा व अभियांत्रीकी पदविका दर्जाची परीक्षा** |
| २ | **कृषी अधिकारी** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **मराठी १२ वी दर्जा,कृषी संबधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा** |
| ३ | **पर्यवेक्षिका** (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | **मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा** |
| ४ | **औषध निर्माण अधिकारी** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **सर्व विषय एस एस सी दर्जाची परीक्षा व औषधशास्त्र संबधि प्रश्न** |
| ५ | **व.सहाय्यक (लेखा)** | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **मराठी १२ वी दर्जा, लेखा विषयक प्रश्न इतर पदवी दर्जाची परीक्षा** |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **एस एस सी दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न** |
| ७ | विस्तार अधिकारी (पंचायत) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | **मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा** |
| ८ | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | **एस एस सी दर्जाची परीक्षा व तांत्रीक प्रश्न** |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबधी प्रश्न पदवीका दर्जाची परीक्षा |
| १० | वरीष्ठ सहाय्यक (लिपीक) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | मराठी १२ वी व इतर पदवी दर्जाची परीक्षा |
| ११ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | सर्व विषय एस एस सी दर्जाची परीक्षा |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा ) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | सर्व विषय एस एस सी दर्जाची परीक्षा |
| १३ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा |
| १४ | परिचर | २० | ४० | ० | ० | २० | ४० | १० | २० | ० | ० | ५० | १०० | इयत्ता ४ थी दर्जा |

११) **अंतिम निवड यादी :-**

११.१ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ दिनांक ०५ जून २०१४ अन्वये गट क मधील कोणत्याही पदासाठी उमेदवारांची निवड करतांना यापुढे मौखीक परीक्षा(मुलाखती) घेण्यात येऊ नये अशा सुचना दिलेल्या असल्याने लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार नियुक्तीकरीता शिफारस करण्यात येणार आहे. तसेच निवड यादीत समाविष्ठ होणेसाठी सदर परीक्षेमध्ये उमेदवारांना एकूण गुणांच्या किमान ४५ % गुण मिळणे अनिवार्य आहे. उमेदवारास लेखी परीक्षेत मिळालेले गुण आणि त्यांचे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून निवड यादी तयार करणेत येईल.

११.२ अंतिम निवड यादी तयार करताना परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन २००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

१. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर
२. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसुचीत जमाती मधील नंतर अनुसुचीत जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर
३. शारिरिकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर
४. माजीसैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर
५. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर
६. वय(वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल),
वरिल प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

१२) **निवडसूची व तिची कालमर्यादा :-** निवड समितीने तयार केलेली निवडसुची एक वर्षासाठी किंवा निवड सूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहे त्या दिनांकापर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल.

१३) या पदभरती कार्यक्रमासंबंधात पात्र/ अपात्र अर्जदारांची यादी, प्रवेशपत्रे, परीक्षेसाठी आसन क्रमांक, परीक्षा केंद्रे, अंतिम निवड यादी, कार्यक्रमात वेळोवेळी झालेले बदल जिल्हाधिकारी रायगड- अलिबाग यांचे कार्यालय आणि रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यालय येथे जाहिर सूचना लावून तसेच रायगड जिल्हयाचे संकेतस्थळ **www.raigad.gov.in** वर प्रदर्शित केले जातील.

**उप मु. का. अ. (सा.प्र.)**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**तथा सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती,**
**रायगड तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा परिषद गट - ड**
**निवड समिती रायगड**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**तथा सदस्य, जिल्हा निवड समिती,**
**रायगड तथा अध्यक्ष,**
**जिल्हा परिषद गट - ड**
**निवड समिती रायगड**

**जिल्हाधिकारी,**
**रायगड-अलिबाग**
**तथा अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती रायगड**